DeccanIAS™ संच क्र. **D**

UPSC/MPSC

# 2020

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET No.
वेळ : 1 (एक) तास

G11

## प्रश्नपुस्तिका

## सामान्य क्षमता चाचणी – 3

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

### सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा–क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा

| परीक्षा–क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे ↑    शेवटचा अंक ↑

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील.''**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

### ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम–82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अश्या व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

Email : executivedeccanias@gmail.com **Mob : 9421535607 /7517685197**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

DeccanIAS

1) पुढे दिलेल्या विधानांपैकी सत्य विधाने ओळखा.

अ) अनुच्छेद 12 मध्ये 'राज्याची' व्याख्या केलेली आहे, एलआयसी (LIC), ओएनजीसी (ONGC),सेल (SAIL), तसेच घटकराज्यांची विधिमंडळे यांचा समावेश राज्य या प्रवर्गात केला जातो.

ब) 'प्रत्यायुक्त विधिविधान' (Delegated Legislation) हे अनुच्छेद 13 अंतर्गत उल्लेख झालेल्या कायद्याच्या प्रवर्गात येते.

क) अनुच्छेद 14 मध्ये अपेक्षित असलेल्या 'कायद्याचे राज्य' या संकल्पनेचा समावेश सर्वोच्च न्यायालयाने घटनेच्या 'मुलभूत संरचनेमध्ये' केला आहे.

1) फक्त क 2) अ, क 3) फक्त अ 4) अ, ब, क

---

2) खालीलपैकी कोणती कृती सर्वोच्च न्यायालय हे 'अभिलेख न्यायालय' (Court of Record) आहे, हे दर्शविते ?

अ) सर्वोच्च न्यायालय संसदेच्या निर्णयांचे पुनर्विलोकन करते.

ब) सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय न्यायसंस्थेत कायदेशीर पायंडा (legal precedent) म्हणून स्वीकारले जातात.

क) सर्वोच्च न्यायालय स्वतःच्या अवमानाकरिता दंड देऊ शकते.

1) फक्त अ 2) ब, क 3) फक्त ब 4) अ, ब, क

---

3) पुढे दिलेल्या विधानांपैकी असत्य विधाने ओळखा.

अ) 'शून्य तास' ज्याचा उल्लेख नुकताच संसदेच्या नियमावलीत केला आहे तो 'प्रश्न कालाच्या' नंतर लगेच सुरू होतो.

ब) तारांकित आणि अतारांकित प्रश्नांमध्ये पुरवणी प्रश्न विचारता येतात.

क) अल्पसूचना प्रश्नांकरिता 21 दिवसांपेक्षा कमी इतक्या काळाकरिता सूचना देणे बंधनकारक असते.

1) फक्त ब 2) फक्त क 3) अ, ब, क 4) यापैकी नाही

---

4) पुढीलपैकी कोणाचे वेतन किंवा भत्ते 'दुसऱ्या परिशिष्टात' (Schedule) नमूद नसते ?

अ) विधानपरिषदांचे अध्यक्ष ब) कॅग

क) घटकराज्यांचे राज्यपाल ड) उच्च न्यायालयाचे न्यायाधीश

1) फक्त अ 2) अ, क, ड 3) अ, ब, क 4) यापैकी नाही

---

5) अनुच्छेद 214 ते 231 अंतर्गत उच्च न्यायालयांची तरतूद केलेली आहे. खालीलपैकी कोणत्या राज्यांना त्यांचे स्वतःचे असे स्वतंत्र उच्च न्यायालय आहे जे इतर कोणाही बरोबर सामायिक नाही ?

अ) उत्तरप्रदेश ब) महाराष्ट्र क) छत्तीसगड

ड) गुजरात इ) ओदिशा

1) अ, क, ड, इ 2) ब, ड 3) अ, ड 4) अ, इ

---

6) चुकीची जोडी ओळखा.

1) के. एम. मुन्शी – भारतीय संविधानाची प्रस्तावना म्हणजे आपल्या सार्वभौम लोकशाही गणराज्याची कुंडली होय, असे मत मांडले.

2) जस्पत रॉय कपूर – मूलभूत हक्कांवरती फार जास्त मर्यादा आहेत अशा आशयाचे मत व्यक्त केले.

3) के. संथानम – असा चेक जो केवळ बँकेकडे संसाधने असल्यावरच वटेल अशा आशयाचे मत 'राज्याच्या धोरणाकरिताच्या मार्गदर्शक तत्त्वांबाबत' व्यक्त केले.

4) इंदिरा गांधी – 'मुलभूत कर्तव्यांमुळे' लोकशाहीतील संतुलन निर्माण होईल.

---

7) बलवंतराय मेहता समितीने पुढीलपैकी कोणती शिफारस केलेली नाही?

अ) पंचायती राज व्यवस्थेतील त्रिस्तरीय उतरंडीतील संस्था अप्रत्यक्ष निवडणुकीद्वारे जोडलेल्या असाव्यात.

ब) जिल्हा परिषदेचे सदस्य अप्रत्यक्ष निवडणूकीद्वारे निवडले जावेत.

क) पंचायत समिती ही कार्यकारी संस्था तर जिल्हा परिषद ही सल्लागार संस्था असावी.

ड) जिल्हाधिकारी हा जिल्हा परिषदेचा अध्यक्ष असावा.

1) फक्त ड 2) ब, क, ड 3) अ, ड 4) यापैकी नाही

---

8) पंतप्रधानांसहित मंत्रिमंडळातील एकूण मंत्र्यांची संख्या लोकसभेच्या सदस्यसंख्येच्या 15% पेक्षा जास्त नसण्याची तरतूद घटनेच्या कितव्या अनुच्छेदांतर्गत करण्यात आली आहे?

1) अनुच्छेद 75 2) अनुच्छेद 77 3) अनुच्छेद 78 4) अनुच्छेद 88

---

9) भारतामध्ये 'प्रमाणित प्रतिनिधित्त्वाची' निवडणुकीची पद्धत खालीलपैकी कोणत्या निवडणुकींकरता वापरली जाते?

अ) राज्यपालांची निवड ब) राष्ट्रपतींची निवड

क) विधानपरिषदेच्या सदस्यांची निवड ड) उपराष्ट्रपतींची निवड

1) फक्त क 2) ब, क 3) ब, क, ड 4) अ, क

---

10) जर एखादी व्यक्ती महाराष्ट्रातील पंचायत समितीतील एकापेक्षा जास्त जागांवर निवडून आली असेल तर तिने पुढीलपैकी कोणाकडे आणि किती दिवसांच्या आत हवी असलेली एक जागा सोडून इतर जागांचा राजीनामा दिला नाही तर त्या सर्व जागा रिक्त होतात?

1) तहसिलदार, 10 दिवस 2) जिल्हाधिकारी, 7 दिवस

3) तहसिलदार, 7 दिवस 4) गटविकास अधिकारी, 7 दिवस

---



DeccanIAS

11) राष्ट्रीय आणीबाणी लागू झाल्यानंतर केवळ राष्ट्रपतींच्या मर्जीने आणि संसदेची कोणतीही परवानगी न घेता कोणत्या मूलभूत हक्कांच्या वापरावरती गदा येते?

1) अनुच्छेद 20 मधील मूलभूत स्वातंत्र्य
2) अनुच्छेद 20 आणि 21 वगळून अस्तित्वात असलेले इतर मूलभूत हक्क
3) अनुच्छेद 19 आणि 20 मधील मूलभूत स्वातंत्र्य
4) यापैकी नाही

---

12) 102 वी घटनादुरूस्ती कायदा कशाशी संबंधित आहे?

1) राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाच्या अधिकारात वाढ करणे.
2) राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाला वैधानिक दर्जा देणे.
3) आर्थिकदृष्ट्या कमकुवत गटांना आरक्षण देणे.
4) यापैकी नाही.

---

13) घटकराज्याच्या विधिमंडळात वार्षिक वित्तीय अहवालाची तरतूद कितव्या अनुच्छेदांतर्गत करण्यात आली आहे?

1) अनुच्छेद 201 2) अनुच्छेद 200 3) अनुच्छेद 202 4) अनुच्छेद 206

---

14) जी. आर ग्लिंग यांनी लिहिलेल्या ग्रंथाच्या आधारे खालीलपैकी कोणी हिंदुस्थानचा इतिहास लिहिला?

1) लोकहितवादी 2) भाऊ दाजी लाड
3) बाळशास्त्री जांभेकर 4) म. गो. रानडे

---

15) पुढे दिलेल्या वृत्तपत्रांच्या नावांचे पर्याय त्यांच्या स्थापनेच्या सालानुसार कालानुक्रमे लावा.

अ) बॉम्बे गॅझेट ब) बॉम्बे टाईम्स क) पूना ऑब्झर्व्हर ड) बॉम्बे हेराल्ड

1) ड-ब-अ-क 2) ड-अ-ब-क 3) ड-क-अ-ब 4) ड-क-ब-अ

---

16) डॉ.रा.गो.भांडारकर यांनी पुढीलपैकी कोणत्या ग्रंथांचे लेखन केले होते?

अ) वैष्णविझम ब) शैविझम ॲंड अदर मायनर रिलिजन्स
क) अर्ली हिस्टरी ऑफ डेक्कन ड) हिस्टरी ऑफ इंडिया

1) अ, ब 2) क, ड 3) फक्त क 4) अ, ब, क, ड

---

17) खालीलपैकी कोणी लिहीलेल्या पुस्तकाला प्रत्युत्तर देण्याकरिता दिनकरराव जवळकर यांनी 'देशाचे दुश्मन' ही पुस्तिका लिहीली?

1) केशवराव जेधे 2) गणपतराव नलावडे 3) हरी नारायण धनवडे 4) मुकुंदराव पाटील

---



DeccanIAS

18) पुढीलपैकी कोणी मुंबईत 'झाडू कामगार मित्रमंडळ' स्थापन केले होते?

1) स्वातंत्र्यवीर सावरकर 2) सेनापती बापट

3) गोपाळ कृष्ण गोखले 4) महात्मा गांधी

---

19) ईस्ट इंडिया कंपनीच्या विरोधातील 'खोंड आदिवासीं'च्या उठावाचे नेतृत्त्व कोणी केले होते?

1) कान्हू 2) चक्र बिशणोई 3) दुर्जन सिंग 4) बिरसा मुंडा

---

20) पुढे काही काँग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षांची नावे दिली आहेत. त्यापैकी कोणत्या अध्यक्ष्यांच्या अधिवेशनात एकमेकांशी तुलना करता सर्वात अधिक सदस्यांची उपस्थिती होती ते ओळखा.

1) महात्मा गांधी 2) मोतीलाल नेहरू

3) अंबिकाचरण मुजुमदार 4) फिरोजशहा मेहता

---

21) पुढीलपैकी कोणत्या वृत्तपत्रात मराठीतील प्रसिद्ध लेखक हरि नारायण आपटे यांच्या कादंबरी प्रकाशनाचा श्रीगणेशा घातला गेला?

1) हिंदुपंच 2) पुणे वैभव 3) प्रभाकर 4) इंदुप्रकाश

---

22) पुढीलपैकी कोण कोल्हापूरातील 'शिवाजी क्लब'शी संबंधित नव्हते?

अ) रघुनाथ विष्णू खानविलकर

ब) राजर्षी शाहू महाराज

क) बापूसाहेब कागलकर

1) फक्त ब 2) ब, क 3) फक्त अ 4) यापैकी नाही

---

23) असहकार चळवळीत पुढीलपैकी कोणते कार्यक्रम काँग्रेसने/गांधींनी स्वीकारले होते?

अ) मेसोपोटेमियातील लष्करी भरतीवर इंग्लंडने बहिष्कार टाकावा.

ब) अस्पृश्यता निवारण

क) परदेशी वस्तुंवर बहिष्कार

1) फक्त अ 2) अ, क 3) ब, क 4) अ, ब, क

---



DeccanIAS

24) योग्य जोड्या जुळवा.

अ) ना.गोखले — 1) ऑस्ट्रेलियाप्रमाणे भारतालाही वसाहतींचे स्वराज्य द्यावे ही मागणी केली.

ब) दादाभाई नौरोजी — 2) गंगानाथ भारतीय विद्यालय स्थापन केले.

क) केशवराव देशपांडे — 3) 'ड्रेन ऑफ वेल्थ'चा सिद्धांत मांडला.

ड) के.डी.कुलकर्णी — 4) बॉम्ब तयार करण्याच्या प्रशिक्षणातील जपानला गेले होते.

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 1 | 3 | 2 | 4 |
| 2) | 1 | 3 | 4 | 2 |
| 3) | 3 | 1 | 2 | 4 |
| 4) | 3 | 1 | 4 | 2 |

---

25) खालीलपैकी कोणती विधाने सत्य आहेत?

अ) मार्टिन बर्ड याला 'उत्तर भारतातील भूमीकर व्यवस्थेचा प्रवर्तक' असे म्हंटले जाते.

ब) मुंबईतील रयतवारी पद्धतीमध्ये जास्तीचा भूमीकर लावला असता शेतकऱ्यांना न्यायालयात अपील करण्याचा अधिकार नव्हता.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही अ आणि ब 4) दोन्ही नाही

---

26) ब्रिटीश सरकारने स्थापन केलेल्या 'रॉयल कमिशन ऑफ लेबर' समोर कामगारांची कैफियत खालीलपैकी कोणी मांडली होती?

1) नारायण मेघाजी लोखंडे 2) जोतीराव फुले

3) वि.रा.शिंदे 4) लाला लजपतराय

---

27) पुढीलपैकी कोणत्या भारतीय नेत्याला 'भारताचे ग्लॅडस्टन' असे म्हणतात?

1) सी.वाय.चिंतामणी 2) दादाभाई नौरोजी

3) गोपाळ गणेश आगरकर 4) डॉ.बी.आर.आंबेडकर

---

28) रमाबाई रानडे यांनी पुढीलपैकी कोणत्या संस्थांच्या स्थापनेत/कार्यात योगदान दिले?

अ) शारदाश्रम

ब) सेवा सदन


क) हिंदू लेडीज सोशल अँड लिटररी क्लब

1) ब, क 2) फक्त ब 3) अ, ब 4) अ, ब, क



DeccanIAS

29) खालील नकाशात टिंबांनी दाखवलेल्या भागात कोणत्या धातूचे केंद्रीकरण झाले आहे?




1) बॉक्साइट

2) लोह

3) मँगनीज

4) चुनखडी

---

30) लोणार सरोवरासंबंधी दिलेल्या विधानांपैकी अयोग्य विधान निवडा.

अ) ते उल्कापाताने तयार झाले आहे.

ब) ते जगातील दुसऱ्या क्रमांकाचे खाऱ्या पाण्याचे सरोवर आहे.

क) या सरोवराच्या परिसरात बाराशे वर्षांपूर्वीची मंदिर आहेत; यापैकी काही सरोवराच्या विवरातच आहेत.

1) फक्त अ 2) अ, ब 3) वरीलपैकी एकही नाही 4) अ, ब, क

---

31) जोड्या जुळवा.

| **ठिकाण** | **जिल्हा** |
|---|---|
| अ) शेगाव | 1) रायगड |
| ब) पोहरादेवी | 2) बुलढाणा |
| क) रामटेक | 3) वाशिम |
| ड) चवदार तळे | 4) नागपूर |

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| 1) | 4 | 3 | 2 | 1 |
| 2) | 3 | 2 | 4 | 1 |
| 3) | 2 | 3 | 4 | 1 |
| 4) | 2 | 3 | 1 | 4 |

---

32) तुमसर तालुक्यात बावनथडी हा आंतरराज्यीय सिंचन प्रकल्प असून तो ........ आणि ....... यांच्या सीमेवर आहे.

1) मध्यप्रदेश, छत्तीसगड 2) महाराष्ट्र, मध्यप्रदेश 3) महाराष्ट्र, छत्तीसगड 4) महाराष्ट्र, तेलंगाणा

---

33) रेशीम उत्पादनात भारताचा जगात कितवा क्रमांक लागतो?

1) पहिला 2) दुसरा 3) पाचवा 4) सातवा

---

34) महाराष्ट्रातील अवर्षणग्रस्त प्रदेश खऱ्या अर्थाने...

1) विदर्भात आहे.
2) मराठवाड्यात आहे.
3) अहमदनगर व सातारा जिल्ह्यात आहे.
4) यवतमाळ जिल्ह्यात आहे.

---

35) राजपिपळा टेकड्या या खालीलपैकी कोणत्या पर्वतरांगाचा भाग आहेत?

1) विंध्य रांग 2) सातपुडा रांगा 3) काराकोरम रांगा 4) अरवली रांगा

---

36) महाराष्ट्रात मुख्यत्वेकरून डोंगराळ परिसरात वास्तव्य करणाऱ्या व सातत्याने भटकत राहणाऱ्या लोकांचा समावेश भटक्या जमाती व विमुक्त जमातीमध्ये केला आहे यामध्ये पुढीलपैकी कोणत्या जमाती येतात?

अ) कैकाडी ब) गोंडी क) बंजारा ड) पारधी
इ) गोसावी फ) वडार ग) ठाकर ह) वासूदेव

1) क, ड, इ, ह 2) अ, ब, क, ड, इ, ह
3) ब आणि ग सोडून सर्व 4) वरील सर्व

---

37) पुढीलपैकी कोणते अभयारण्य औरंगाबाद विभागात येत नाही?

1) नायगाव-मयूर 2) जायकवाडी पक्षी अभयारण्य
3) काटेपूर्णा 4) येडशी-रामलिंग घाट

---

38) 1 जुलै 1998 रोजी .......... आणि .......... जिल्ह्याचे विभाजन होऊन अनुक्रमे ........ आणि वाशिम असे दोन नवीन जिल्हे निर्माण झाले.

1) परभणी व अकोला, नंदूरबार
2) औरंगाबाद व धुळे, जालना
3) औरंगाबाद व अकोला, जालना
4) धुळे व अकोला, नंदूरबार


---

39) सातपुडा पर्वतरांगातील चिखलदरा पर्वताची उंची ........ इतकी आहे.

1) 1115 मी. 2) 1315 मी. 3) 1414 मी. 4) 800 मी.

---

40) पुढे दिलेला नकाशा महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्याचा आहे?




1) नांदेड

2) सोलापूर

3) लातूर

4) यवतमाळ

---

41) 2011च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात सर्वात जास्त अनुसूचित जातीचे लोक ........... जिल्ह्यात आहेत.

1) नागपूर 2) पुणे 3) सोलापूर 4) ठाणे

---

42) पर्वतीय वाऱ्यांना 'फॉन' वारे असे जगातील कोणत्या भागात म्हणतात?

1) अमेरिका आणि मेक्सिको

2) ब्राझील आणि अर्जेंटीना

3) जपान आणि रशिया

4) आल्प्स पर्वत परिसर आणि इटली

---

43) पृथ्वीच्या एकूण घनफळाच्या ......... इतका भाग भूकवच (Crust) ने व्यापला आहे.

1) 16% 2) 1% पेक्षा कमी भाग 3) जवळपास 5% 4) 32%

---

44) 2018-19 च्या आकडेवारीनुसार, भारताच्या दहा सर्वात मोठ्या व्यापार भागीदार देशांच्या संदर्भात योग्य विधाने ओळखा.

अ) या दहा देशांचा भारताच्या एकूण व्यापारामधील वाटा हा 50% पेक्षा अधिक आहे.

ब) या दहा देशांपैकी एकाही देशासोबत भारताचा व्यापारशेष (trade surplus) नाही.

क) या दहा देशांचा विचार करता, यांचा भारताच्या एकूण निर्यातीमधील वाटा (share in total exports from India) हा भारताच्या एकूण आयातीमधील वाट्यापेक्षा कमी आहे.

1) फक्त अ, ब 2) फक्त ब, क 3) फक्त अ, क 4) सर्व

---

45) बेरोजगारीचे मोजमाप करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या खालीलपैकी कोणत्या पद्धतीमध्ये बेरोजगार व्यक्तींची गणना न करता बेराजगार मनुष्य-दिनांची (person-days) गणना केली जाते?

1) सर्वसाधारण मुख्य स्थिती (Usual Principal Status)

2) सर्वसाधारण मुख्य व दुय्यम स्थिती (Usual Principal and Subsidary Status)

3) चालू साप्ताहिक स्थिती (Current Weekly Status)

4) चालू दैनिक स्थिती (Current Daily Status)

---

46) बहुआयामी दारिद्र निर्देशांका (Multi-dimesional Poverty Index) संदर्भात खालीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत?

अ) या निर्देशांकानुसार 33.33% पेक्षा अधिक वंचितता (deprivation) असणाऱ्या व्यक्तींना/कुटुंबांना बहुआयामी गरीब (multidimensionally poor) म्हटले जाते.

ब) या निर्देशांकामध्ये 'जीवनमानाचा दर्जा' (Standard of living) आयामा (dimension) मधील 'उत्पन्न' (income) हा घटक वंचितत्त्व ठरवताना परिणामकारक ठरतो.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही 4) एकही नाही

---

47) सध्याच्या परिस्थितीचा विचार करता भारतीय केंद्र सरकारने कर्ज घेतले तर -

अ) केंद्र सरकारची भांडवली जमा (Capital receipts) वाढेल

ब) केंद्र सरकारची राजकोषीय तूट (Fiscal Deficit) वाढेल

क) केंद्र सरकारची अर्थसंकल्पीय तूट (Budgetary Deficit) वाढेल

1) फक्त अ, ब बरोबर 2) फक्त ब, क बरोबर

3) फक्त अ, क बरोबर 4) सर्व विधाने बरोबर

---

48) भारतातील औद्योगिक क्षेत्राच्या प्रगतीचा लेखाजोखा ठेवणाऱ्या 'औद्योगिक उत्पादन निर्देशांका' (Index of Industrial Production) चे आधारभूत वर्ष (Base Year) हे .... आहे.

1) 2004-05 2) 2011-12 3) 2014-15 4) 2017-18

---

49) वस्तू आणि सेवा करा(GST)च्या कर प्रणालीमध्ये सध्या खालीलपैकी कोणत्या करांचे उत्पन्न हे पूर्णतः अथवा अंशतः राज्यांना/केंद्रशासित प्रदेशांना मिळते?

अ) CGST ब) SGST क) IGST

ड) UTGST इ) GST Compensation Cess

1) फक्त अ, ब, क, ड 2) फक्त ब, क, ड, इ 3) फक्त अ, ब, ड, इ 4) सर्व

---



DeccanIAS

50) पुढे दिलेल्या विधानांपैकी योग्य विधाने ओळखा.

अ) IMF ही संस्था मुख्यत्वेकरून व्यवहारातोल (Balance of Payment) सुधारण्यासाठी कर्जे देते.

ब) जागतिक बँकेची IBRD ही उपसंस्था पुनर्बांधणी आणि विकासासाठी दीर्घकालीन कर्जे देते.

क) IMF आणि IBRD या दोन्ही संस्थांमध्ये कर्जे देण्यासाठी 'कोटा पद्धती' चा वापर होतो.

1) फक्त अ, ब
2) फक्त अ
3) फक्त ब, क
4) फक्त अ, क

---

51) शेतकऱ्यांना शेतमालाला रास्त भाव मिळवून देण्याकरिता महत्त्वाच्या ठरणाऱ्या 'किमान आधारभूत किंमती' (MSP) संदर्भात शिफारशी करणारा 'कृषी खर्च आणि किंमती आयोग' (Commission on Agricultural Costs and Prices) हा सध्या किती पिकांसाठी किमान आधारभूत किंमत देतो ?

1) 21
2) 22
3) 23
4) 24

---

52) आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण टाळणारा 'MRTP कायदा' हा ....., तर निरोगी स्पर्धेस बळकटी देणारा 'कॉम्पिटिशन ॲक्ट' हा ... पंचवार्षिक योजनेदरम्यान पारित करण्यात आला.

1) तिसऱ्या, दहाव्या
2) चौथ्या, नवव्या
3) चौथ्या, दहाव्या
4) तिसऱ्या, नवव्या

---

53) खालीलपैकी कोणते बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या पायाभूत सुविधा क्षेत्रातील उद्दीष्ट योग्यरित्या नोंदवलेले नाही ?

1) 2017 अखेरपर्यंत सर्व ग्रामीण कुटुंबांना वीजपुरवठा
2) 50% ग्रामीण लोकसंख्येला शुद्ध पेयजलाचा पुरवठा
3) 2017 पर्यंत सर्व गावांना रस्ते.
4) ईस्टर्न आणि वेस्टर्न फ्रेट कॉरीडॉर पूर्ण करणे.

---

54) 'शाश्वत विकास ध्येयां' (SDGs) मध्ये खालीलपैकी कोणत्या बाबीचा समावेश होत नाही ?

अ) वाळवंटीकरणा (Desertification) चा सामना

ब) शाश्वत उत्पादन (Sustainable)

क) शाश्वत उपभोग (Sustainable consumption)

1) फक्त अ
2) फक्त ब
3) फक्त क
4) वरीलपैकी एकही बरोबर नाही.

---

55) नीती आयोग हा –

अ) पूर्वाश्रमीच्या योजना आयोगाप्रमाणेच एक वैधानिक (Statutory) संस्था आहे.

ब) पूर्वाश्रमीच्या योजना आयोगाची सर्व कामे करतो आहे.

क) पूर्वाश्रमीच्या योजना आयोगाप्रमाणे एक संवैधानिक (Constitutional) संस्था आहे.

1) फक्त अ, ब बरोबर
2) फक्त ब, क बरोबर
3) फक्त अ बरोबर
4) एकही बरोबर नाही

---

56) 2011 च्या जनगणनेनुसार,

अ) भारताच्या ग्रामीण लोकसंख्येमधील शेकडा वाढ ही शहरी लोकसंख्येमधील वाढीच्या तीपटीपेक्षा अधिक होती.

ब) भारताच्या एकूण शहरी लोकसंख्येपैकी सर्वाधिक लोकसंख्या महाराष्ट्रामध्ये आहे.

1) फक्त अ बरोबर
2) फक्त ब बरोबर
3) दोन्ही बरोबर
4) एकही बरोबर नाही

---

57) 2011 च्या जनगणनेनुसानर भारताच्या लोकसंख्येतील खालील वयोगटांचा एकूण लोकसंख्येतील त्यांच्या प्रमाणानुसार योग्य चढता क्रम कोणता?

अ) 0–14 वर्षे    ब) 15 –59 वर्षे    क) 60+ वर्षे

1) अ–ब–क
2) क–ब–अ
3) अ–क–ब
4) क–अ–ब

---

58) जून 2018 पर्यंतचा विचार करता खालीलपैकी कोणत्या प्रदेशामध्ये भारतात येणाऱ्या एकूण FDI पैकी सर्वाधिक FDI झाली आहे?

1) कर्नाटक
2) तामिळनाडू
3) गुजरात
4) राष्ट्रीय राजधानी क्षेत्र, (NCT) दिल्ली

---

59) भारतातील पहिल्या महिला पोलिस महासंचालक कांचन चौधरी भट्टाचार्य यांचे ऑगस्ट 2019 मध्ये मुंबई येथे निधन झाले त्यांनी …….. या राज्याच्या 'पोलिस महासंचालक'(DGP) म्हणून कार्य केले.

1) हिमाचल प्रदेश
2) उत्तराखंड
3) उत्तर प्रदेश
4) पश्चिम बंगाल

---

60) 'रिथिंकींग गुड गव्हर्नन्स' (Rethinking Good Governance) या पुस्तकाचे लेखक कोण आहेत?

1) रघुराम राजन
2) पी.चिदंबरम
3) विनोद राय
4) ई.श्रीधरन

---



DeccanIAS

61) खालील विधाने विचारात घ्या.

अ) सप्टेंबर 2019 मध्ये कझाकस्तान (Kazakhstan) येथे पार पडलेल्या पुरूषांच्या जागतिक बॉक्सिंग स्पर्धेत भारताने एकूण 2 पदके जिंकली.

ब) या स्पर्धेत भारताच्या अमित पांघल याने रौप्यपदक जिंकले.

क) विजेंदर सिंह नंतर जागतिक बॉक्सिंग स्पर्धेची अंतिम फेरी गाठणारा अमित पांघल हा दुसरा भारतीय खेळाडू ठरला.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/त?

1) अ आणि ब 2) ब आणि क
3) फक्त ब 4) अ आणि क

---

62) 'एकुवेरिन' (Ekuverin) हा भारत व ……… यांच्या दरम्यान होणारा संयुक्त लष्करी युद्ध सराव आहे.

1) सिंगापूर 2) श्रीलंका
3) इंडोनेशिया 4) मालदीव

---

63) 17 व्या लोकसभा निवडणूकीत महाराष्ट्रात सर्वाधिक नोटा (NOTA) मतदानाचा वापर ……. या जिल्ह्यात झाला?

1) नंदुरबार 2) गडचिरोली 3) पालघर 4) वर्धा

---

64) खालीलपैकी कोणत्या राज्यात भारतीय रेल्वेचे 18 वे क्षेत्र (Zone) स्थापन केले जाणार आहे?

1) तमिळनाडू 2) आंध्रप्रदेश 3) झारखंड 4) कर्नाटक

---

65) 'आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर' (ISS) यंत्रमानव पाठविणाऱ्या देशांमध्ये खालीलपैकी कोणत्या देशांचा समावेश होतो?

1) अमेरिका, चीन, रशिया 2) रशिया, जपान, चीन
3) अमेरिका, जपान, रशिया 4) रशिया, अमेरिका, चीन

---

66) खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

अ) 'जागतिक शांतता निर्देशांक 2019' नुसार 'स्वीडन' हा जगातील सर्वात शांत देश आहे.

ब) या निर्देशांकानुसार भारत जगात 141 व्या क्रमांकावर आहे.

क) 2018 च्या निर्देशांकानुसार भारत 136 व्या क्रमांकावर होता.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) फक्त क 4) कोणतेही नाही

---



DeccanIAS

67) भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश मदन बी.लोकुर यांची खालीलपैकी कोणत्या देशाच्या सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली आहे?

1) सिंगापूर 2) मॉरिशस 3) फिजी 4) मालदीव

---

68) खालीलपैकी कोणत्या देशात जगातील पहिली 'मानवाधिकार टेलिव्हिजन वाहिनी' (First Human Rights TV Channel) सुरू करण्यात आली?

1) अमेरिका 2) इंग्लंड 3) नॉर्वे 4) जर्मनी

---

69) तेलंगणा राज्यातील 'कालेश्वरम उपसा सिंचन प्रकल्पामुळे' महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यांना फायदा होणार आहे?

1) लातूर, नांदेड, यवतमाळ, गडचिरोली
2) चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली
3) नांदेड, यवतमाळ, भंडारा, गडचिरोली
4) यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली

---

70) दुर्गम भागात अत्यावश्यक वैद्यकीय सुविधा पुरविता याव्या म्हणून भारतातील कोणत्या राज्यात प्रायोगिक तत्वावर 'मेडिसिन फ्रॉम द स्काय' हा प्रकल्प सुरू करण्यात आला?

1) ओडिशा 2) छत्तीसगढ 3) झारखंड 4) तेलंगणा

---

71) ईशान्य भारतात पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेली 'राष्ट्रीय ई-प्रशासन परिषद'(National Conference on e-Goverence) ऑगस्ट 2019 मध्ये कोणत्या राज्यात आयोजित करण्यात आली होती?

1) मणिपूर 2) मेघालय 3) आसाम 4) त्रिपुरा

---

72) ......... रोजी भारताच्या मंगळयान मोहिमेस 5 वर्षे पूर्ण झाली?

1) 26 ऑगस्ट 2019
2) 14 ऑक्टोबर 2019
3) 24 सप्टेंबर 2019
4) 05 नोव्हेंबर 2019

---

73) योग्य जोडी ओळखा.

अ) अपसारी भिंग (Diverging Lens) – अंतर्वक्र (Concave)
ब) अभिसारी भिंग (Converging Lens) – अंतर्वक्र (Concave)
क) अपसारी आरसा (Diverging Mirror) – बहिर्वक्र ( Convex)
ड) अभिसारी आरसा ( Converging Mirror) – बहिर्वक्र (Convex)

1) अ, क 2) ब, क 3) अ, ड 4) ब, ड

---

74) मानवी पाठीच्या कण्यातील (Vertebral Column) पुढील मणक्यांना त्यांच्या योग्य क्रमाने वरपासून खालपर्यंत मांडा.

अ) सर्व्हायकल मणके (7)

ब) थोरॅसिक मणके (12)

क) कॉकिक्स (माकडहाड) (4)

ड) सॅक्रल (5)

इ) लुंबार (5)

1) क, अ, ब, ड, इ 2) क, ड, इ, ब, अ 3) अ, ब, इ, ड, क 4) ड, इ, ब, अ, क

---

75) पुढे दिलेल्या विधानांपैकी योग्य विधाने ओळखा.

अ) सायक्लोस्टोमाटा या प्राण्यांना जबडेयुक्त मुख असते व हे प्राणी जलचर असतात.

ब) सुपरक्लास पायसेस व सुपर क्लास टेट्रापोडा हे जबडेयुक्त प्राणी या वर्गातील उपवर्ग (superclass) होत.

क) उभयचर वर्गातील प्राण्यांच्या हृदयाला तीन कप्पे असतात तर मत्स्य वर्गातील प्राण्यांच्या हृदयाला चार कप्पे असतात.

1) अ, ब 2) ब, क 3) फक्त ब 4) अ, ब, क

---

76) योग्य जोड्या जुळवा.

| **पूर्वनाम** | **फॅक्टर** |
|---|---|
| अ) गीगा | 1) $10^{-9}$ |
| ब) नॅनो | 2) $10^{-18}$ |
| क) अटटो | 3) $10^{9}$ |
| ड) योटटा | 4) $10^{24}$ |

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| 1) | 1 | 3 | 2 | 4 |
| 2) | 3 | 1 | 2 | 4 |
| 3) | 2 | 1 | 3 | 4 |
| 4) | 3 | 1 | 4 | 2 |

---

77) पुढीलपैकी कोणत्या राशी अदिश राशी (scalar) आहेत?

अ) बल ब) वजन क) तापमान

ड) घनता इ) चुंबकीय क्षेत्र फ) विद्युत उर्जा

1) ब, फ सोडून सर्व 2) फक्त अ, ब, क, ड 3) अ, इ सोडून सर्व 4) फक्त क, ड

---



DeccanIAS

78) ठराविक उंचीवरून एखादी अवजड वस्तू एकदाच खाली सोडल्यास त्यापैकी अवजड वस्तू लवकर खाली येते व हलकी वस्तू येण्यास काही अवधी लागतो. यावरून कोणते निष्कर्ष लावता येतात?

अ) अवजड वस्तूवर गुरूत्वीय त्वरण (acceleration due to gravity) जास्त लागते तर हलक्या वस्तूवर कमी लागते.

ब) अवजड वस्तू जाणवणारा प्रतिरोध लवकर पार करते तर हलक्या वस्तूला ते करण्यास वेळ लागतो.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ आणि ब दोन्ही 4) दोन्ही नाही

---

79) पुढीलपैकी कोणकोणत्या जीवांच्या शरीरात असणाऱ्या पेशींना पेशीभित्तीका (Cell wall) असतात?

अ) अल्गी ब) बुरशी (Fungi)

क) बेहडा ड) सरडा

1) अ, क 2) फक्त अ 3) ड सोडून सर्व 4) क, ड सोडनू सर्व

---

80) पुढे दिलेल्या विधानांपैकी योग्य विधाने निवडा.

अ) दोन हाडे एकमेकांशी 'टेंडन'ने जोडलेले असतात.

ब) स्केलेटल मसल या फिकट-गडद अशा पट्ट्यांपासून बनलेले असतात.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही अ आणि ब 4) दोन्ही नाही

---

81) मानवामध्ये मनाची एकाग्रता, नियोजन, निर्णयक्षमता, स्मरणशक्ती, बुद्धीमत्ता आणि बृद्धीविषयक कार्य आणि विचार करण्याची क्षमता असलेला प्रमुख भाग कोणता?

1) पश्चमस्तिष्क (Cerebellum) 2) प्रमस्तिष्क (Cerebrum)

3) मध्यमस्तिष्क (Medulla Oblangata) 4) चेतारज्जू (Spinal Chord)

---

82) आपल्या डोळ्यांच्या दृष्टीपटलातील (Retina) दंडपेशी (Rod Cell) आणि शंकुपेशी (Cone cell) यामधील .......... या प्रकाशसंवेदनशील रंगद्रव्याची निर्मिती जीवनसत्त्व 'अ' पासून होते.

1) रोडोप्सीन 2) ट्रिप्सीन 3) थ्रोंबीन 4) ॲक्टीन

---

83) जैवतंत्रज्ञान किंवा जेनेटीक्स या अभ्यासशाखेत 'ट्रान्सलेशन' ही संज्ञा अभ्यासली जाते याचा अर्थ काय आहे?

1) DNA पासून RNA तयार होणे.

2) RNA पासून DNA तयार होणे.

3) RNA ची माहिती घेऊन अमिनो आम्ल तयार होणे.

4) DNA पासून विशिष्ट संप्रेरकांची (Hormone) निर्मिती होणे.



DeccanIAS

84) बिडाच्या वस्तू किंवा लोखंडाचे जाडे काम यातील भेगा/पोकळी गॅमा किरणांच्या सहाय्याने पाहता येतात यासाठी .... किंवा .... ही समस्थानिके रेडीओग्राफी कॅमेरामध्ये वापरली जातात.

1) कोबाल्ट 60, कार्बन 14
2) ऑक्सीजन 16, फॉस्फरस 31
3) कोबाल्ट 60, इरिडीयम 192
4) आयोडीन 131, क्लोरीन 36

---

85) दिलेल्या वर्णनावरून व्यक्ती ओळखा.

- त्यांनी निरनिराळ्या कक्षांमधील जास्तीत जासत इलेक्ट्रॉनची संख्या शोधण्यासाठी $2n^2$ हे सूत्र दिले.
- त्यांनी सांगीतले की केंद्रकापासून (nucleus) दूर जाताना कक्षांची उर्जापातळी वाढत जाते.
- कक्षा क्रमांक 1, 2, 3, 4.... यांना त्यांनी अनुक्रमे K, L, M, N, O, P अशी नावे दिली.

1) अर्नेस्ट रूदरफोर्ड
2) नील्स बोहर
3) सर जे. जे. थॉम्सन
4) जेम्स चॅडवीक

---

86) ॲनोडायझिंग (Anodising) या प्रक्रियेत विद्युतधारेचा उपयोग करून एखाद्या धातूच्या पृष्ठभागावर ... चा थर वाढवला जातो.

1) ऑक्साइड
2) सल्फाइड
3) क्लोराइड
4) हायडॉक्साइड

---

87) दिनू, निलू, मनू, संजू हे शाळेमध्ये मधल्या सुट्टीत खेळत होते. खेळता-खेळता त्यांच्याकडून एक पाण्याचा 'माठ' फुटतो तो 'माठ' कोणाकडून फुटला हे सर्वांना माहिती आहे. आणि प्रत्येकाने त्यासंबंधाने प्रतिपादन केले. जर त्यांच्यापैकी फक्त एक जण सत्य प्रतिपादन करत असेल तर माठ फोडणारी व्यक्ती निवडा.

संजू : मी माठ फोडला नाही व दिनूनेही तो फोडला नाही.
निलू : मी माठ फोडला नाही व संजूनेही तो फोडला नाही.
दिनू : मी माठ फोडला नाही व निलूनेही तो फोडला नाही.
मनू : मी माठ फोडला नाही व संजूनेही तो फोडला नाही.

पर्यायी उत्तरे :-

1) दिनू
2) निलू
3) मनू
4) संजू

---

88) A3P म्हणजे A ही P ची आई आहे.
A4P म्हणजे A हा P चा भाऊ आहे.
A5P म्हणजे A ही P ची मुलगी आहे.
A9P म्हणजे A हा P चा पती आहे.

तर खालीलपैकी कोणता पर्याय निर्देशित करेल की, M हा K चा जावई आहे आणि J ही M ची मेहुणी आहे?

1) M9N3K4J
2) K5J9M3N
3) M9N5K3J
4) वरीलपैकी एकही नाही

---



DeccanIAS

89) एका कुटुंबातील सहा सदस्य, A, B, C, D, E आणि F हे एका गाडीतून प्रवास करत आहेत. B हा C चा मुलगा आहे परंतु 'C' ही व्यक्ती B ची आई नाही. A व C हे विवाहीत जोडपे आहे. E हा C चा भाऊ आहे. F हा B चा भाऊ आहे आणि D ही A ची मुलगी आहे.

वरील माहितीवरून खालीलपैकी बिनचूक नसलेले विधान निवडा.

1) D च्या वडिलांचे नाव C आहे.

2) E च्या पुतण्याचे नाव F आहे.

3) D ही E ची पुतणी आहे.

4) E हा D चा मामा आहे.

---

90) खालील दोन विधानांचा अभ्यास करा.

A) सर्व टायपिस्ट स्टेनोग्राफर्स आहे.

B) काही टायपिस्ट मुली आहेत.

या विधानांवरुन सर्वात तर्कसंगत असणाऱ्या निष्कर्षांची निवड करा.

निष्कर्ष :-

I) सर्व मुली स्टेनोग्राफर आहेत.

II) सर्व स्टेनोग्राफर टायपीस्ट आहेत.

III) काही मुली स्टेनोग्राफर आहेत.

IV) एकही मुलगी स्टेनोग्राफर नाही.

1) फक्त I 2) फक्त III 3) फक्त IV 4) फक्त I & II

---

91) एका धावण्याच्या मॅरॅथॉन स्पर्धेत महेश पाठीमागून पंधराव्या क्रमाकांवर धावत आहे तर गणेश हा पुढच्या बाजूने अठराव्या क्रमांकावर धावत आहे. जर महेश हा गणेशच्या जागी असता तर त्याचा पाठीमागून विसावा क्रमांक ठरला असता. तर या माहितीवरून खालीलपैकी कोणते विधान अचूक नाही?

1) या स्पर्धेत एकूण 37 व्यक्ती आहेत.

2) सध्या महेश पुढच्या बाजूने तेविसाव्या क्रमांकावर धावत आहे.

3) जर महेशला गणेशला ओलांडून पुढे जायचे असेल तर पाच जणांना मागे टाकावे लागेल.

4) वरीलपैकी एकही नाही

---

92) एका सांकेतिक भाषेत 'ABOVE' हे 'CAQUG' या प्रकारे लिहिले जाते, तर 'BELOW' या शब्दाचे संकेतन कशा प्रकारे केले जाईल?

1) DDMNY 2) DCMNY 3) DDNNY 4) DDNMY

---



DeccanIAS

93) खालील शृंखलेमध्ये येणारी पुढची संख्या कोणती येईल?

8, 7, 7, 7, 6, 7, 5, ?

1) 5 2) 6 3) 7 4) 8

---

94) एका कॅरमच्या मॅचमध्ये बॉबी, रवी, सनी व दिपू हे दोन टिम पाडून मॅच खेळतात. रवी व दिपू आणि सनी व बॉबी हे पार्टनर म्हणून खेळतात. बॉबी हा दिपूच्या उजव्या बाजूला आहे व दिपूचे तोंड पश्चिमेला असेल तर खालीलपैकी कोणते वाक्य चुकीचे आहे?

1) रवीचे तोंड पूर्वेकडे आहे.

2) सनीचे तोंड उत्तरेला आहे.

3) रवी हा सनीच्या डाव्या बाजूला नव्हे तर उजव्या बाजूला बसला आहे.

4) यापैकी एकही नाही

---

95) प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल?


| | | |
|---|---|---|
| 9 | 12 | 7 |
| 6 | 7 | 4 |
| 45 | 95 | ? |

1) 33 2) 35

3) 55 4) 32

---

96) खाली एका ठोकळ्याच्या 4 वेगवेगळ्या स्थिती दर्शविल्या आहेत, तर 2 या अंकाच्या विरूद्ध बाजूस कोणता अंक येईल?




1) 5 2) 4 3) 6 4) 1

---



DeccanIAS


97) काहीजण जे सरकारी व्यवसाय खासगी हातात ठेवण्यास अनुकुल आहेत ते असे सुचवित आहेत की, खासगी पर्यावरणीय समूहांनी जर एखाद्या राष्ट्रीय उद्यानाचे (जे सध्या सरकार संचालित आहे) संचालन केले व त्याच्या संवर्धनासाठी लागणारा वित्तपुरवठा केला तर राष्ट्रीय उद्यानाच्या संवर्धनाचा हेतू चांगल्या प्रकारे साधता येईल. खाली दिलेली विधाने वास्तववादी शक्यता आहे असे गृहीत धरले तर कोणते विधान वरील सुचनेविरूद्ध जोरदार युक्तिवाद करेल?


1) खासगी पर्यावरणवाद्यांच्या समूहामध्ये असे लोक सहभागी होण्याची शक्यता आहे की, ज्यांना नैसर्गिक साधनसंपत्तीचे शोषण होऊ नये म्हणून असणारी सरकारी बंधने उठवायची आहेत.
2) खासगी पर्यावरणवाद्यांचे समूह नेहमीच संवर्धनाच्या सर्वोत्तम मार्गासाठी सहमत होतीलच असे नाही.
3) एखादे उद्यान नियंत्रित करण्यासाठी खासगी पर्यावरणवाद्यांच्या समूहांमध्ये स्पर्धा वाढू शकते.
4) जर उद्यानाची सिमा वाढवायची असल्यास खासगी पर्यावरणवाद्यांच्या वाढीव खर्चाच्या सिमा मर्यादित असतात त्यांना त्यासाठी इतरांकडे हात पसरावे लागतील.

---

98) खालील प्रश्नाकृतीचे तुटक रेषेवर घडी घातली असता कोणत्या पर्यायाची आकृती तयार होईल?

प्रश्नाकृती





(a) (b) (c) (d)

---

99) एक व्यक्ती घरून ऑफिसला ताशी 30 कि.मी. वेगाने गेली तर 10 मिनिटे उशिरा पोहचते आणि ताशी 40 कि.मी. वेगाने गेली तर 5 मिनिटे लवकर पोहचते. तर घरापासून ऑफिसचे अंतर दर्शविणारा पर्याय निवडा.

1) 18 कि.मी. 2) 30 कि.मी.
3) 40 कि.मी. 4) 10 कि.मी.

---

100) एक काम A, B व C मिळून 8 दिवसात पूर्ण करतात. B व C मिळून तेच काम 24 दिवसात पूर्ण करतात. B एकटा ते काम 40 दिवसात पूर्ण करतो. जर ते एकटा 'C' करत असेल तर तो किती दिवसात करेल?

1) 30 2) 20 3) 24 4) 60

****

सूचना – ( पृष्ठ 1 वरून पुढे......)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम – 82'' यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग–1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.

---

## नमुना प्रश्न

प्र.क्र 201. सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर ''(3) राजा राममोहन रॉय'' असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर ''(3)'' होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तरक्रमांक ''③'' हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र.क्र.201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररित्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये पहावा.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

DeccanIAS